# बी.ए. (इतिहास)

## द्वितीय वर्ष : सत्र ३

## गृहपाठ : २०१६–१७

### मराठ्यांचा इतिहास (शिवकाळ) (HC-302)

**(सत्र ३ : अभ्यासासाठी प्रकरणे : प्रकरण क्र. *१ ते ७*)**

**टीप : नमुना उत्तरात दिलेली प्रस्तावना व समारोप हे उदाहरणादाखल आहेत. त्या व्यतिरिक्त प्रश्नाशी सुसंगत अशी प्रस्तावना व समारोप स्वतंत्रपणे लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**१. मराठी राज्याच्या उदयास कारणीभूत ठरलेले घटक कोणते? गुण : १५**

**प्रस्तावना** : मराठी राज्याच्या उदयाबाबत ग्रँट डफ याचा वणवा सिध्दांत. न्या. रानड्यांचे योगदान याबाबत ४ ते ५ वाक्ये लिहावीत.

**मराठी राज्याच्या उदयास कारणीभूत ठरलेले घटक** : महाराष्ट्राची भौगोलिक वैशिष्ट्ये, मराठी लोकांची वैशिष्ट्ये, राजकीय परिस्थिती : अनुकूल व प्रतिकूल घटक, संतांची कामगिरी, इतर पुरक घटक, शिवाजीमहाराज

**समारोप** : मराठी राज्याच्या उदयाचे महत्त्व ४ ते ५ वौ यात लिहावे.

**२. संभाजीच्या कार्याचे मूल्यमापन करा. गुण : १५**

**प्रस्तावना** : अंतर्गत संघर्ष व संभाजीचे सत्ताग्रहण याबाबत ४ ते ५ वौ यात लिहावे.

**संभाजीच्या कार्याचे मूल्यमापन** : संभाजीचे गुण व दोष यासंदर्भात पुढील मुद्द्याचा विस्तार करावा. सत्तासंघर्ष, राजकीय कामगिरी, राज्यकारभार, कवी कलुश व संभाजी संबंध, यशापयश, शेवट.

**समारोप** : संभाजीचा मृत्यू आणि नंतरचा स्वातंत्र्यलढा याबाबत ४ ते ५ वौ ये लिहावीत.

**३. थोडै यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन) गुण : १५**

**अ) मराठ्यांच्या इतिहासाच्या मराठी संदर्भ साधनांची माहिती लिहा.**

**प्रस्तावना** : मराठ्यांच्या इतिहासाची लिखित साधने यावर २ ते ३ वौ ये लिहावीत.

**मराठ्यांच्या इतिहासाची मराठी संदर्भ साधने** : सरकारी कागदपत्रे, शकावल्या, शिलालेख, रोजनिशा, बखरी, ललित साहित्य : संत काव्य, पंत काव्य, शाहिरी काव्य

**समारोप** : मराठी संदर्भ साधनांचे महत्त्व २ ते ३ वौ यात लिहावे.

**आ) सिद्दी जौहरच्या मोहीमेची माहिती लिहा.**

**प्रस्तावना** : अफझलखान वधानंतरची आदिलशाहीची अवस्था याबाबत २ ते ३ वौ ये लिहावीत.

**सिद्दी जौहरची मोहीम** : मोहीमेचे कारण, पन्हाळ्याचा वेढा, शिवाजीमहाराजांची पन्हाळ्याहून सुटका, पावनखिंडीचा लढा व मोहीमेचा शेवट

**समारोप** : शायिस्तेखानाची मोहीम आणि तिचा आदिलशाहीबरोबरील संघर्षावर झालेला परिणाम याबाबत २ ते ३ वौ ये लिहावीत.

**इ) शिवाजीमहाराजांच्या कर्नाटक मोहीमेची कारणे लिहा.**

**प्रस्तावना** : राज्याभिषेकानंतरची व शिवाजीमहाराजांच्या आयुष्यातील सर्वात मोठी मोहीम.

**शिवाजीमहाराजांच्या कर्नाटक मोहीमेची कारणे** : पैसे मिळविणे, जहागिरीवरील हक्क मिळविणे, कर्नाटकातील अनुकूल राजकीय परिस्थिती, मादण्णाचा हेतू, रघुनाथपंत हणमंतेचा हेतू, व्यंकोजीला स्वतंत्र राज्याची प्रेरणा देणे, संरक्षण सीमा तयार करणे.
**समारोप** : कर्नाटक मोहिमेचे परिणाम २ ते ३ वौ यात लिहावेत.

**ई) ताराबाईच्या कारकिर्दीतील मराठे-मुघल संघर्षाचा आढावा घ्या.**
**प्रस्तावना** : राजारामाचा मृत्यू व ताराबाईचे नेतृत्व यावर २ ते ३ वौ ये लिहावीत.
**ताराबाईच्या कारकिर्दीतील मराठे-मुघल संघर्ष** : महत्त्वाचे गड मुघलांच्या ताब्यात, मराठ्यांचा कडवा व चिवट प्रतिकार आणि ताराबाईचे कर्तृत्व, धनाजी जाधवाचा पराक्रम, औरंगजेबाचा मृत्यू व संघर्षाचा शेवट
**समारोप** : शाहू-ताराबाई संघर्षाबाबत २ ते ३ वौ ये लिहावीत.

**४. टिपा लिहा.** (कोणत्याही दोन) **गुण : १५**

**अ) मराठ्यांच्या इतिहासाची भौतिक साधने**
**प्रस्तावना** : इतिहासाची भौतिक साधने म्हणजे काय ते २ ते ३ वौ यात लिहावे.
**प्राचीन भारताच्या इतिहासाची भौतिक साधने** : स्थापत्य / इमारती व त्यांचे अवशेष, वस्तू
**समारोप** : भौतिक साधनांचे महत्त्व २ ते ३ वौ यात लिहा.

**आ) जावळी प्रकरण**
**प्रस्तावना** : जावळीच्या प्रदेशाबाबत २ ते ३ वौ ये लिहावीत.
**जावळी प्रकरण** : जावळी व आदिलशाही संबंध, जावळीचे मोरे व त्यांचा स्वराज्यास उपद्रव, जावळीवरील हल्ला, चंद्रराव मोरेची हत्त्या, जावळी मोहीमेचा फायदा
**समारोप** : जावळीनंतरच्या शिवाजीमहाराजांच्या हालचालींबाबत २ ते ३ वौ ये लिहावीत.

**इ) सुरतेवरील पहिला हल्ला (इ.स. १६६४)**
**प्रस्तावना** : शायिस्तेखानावरील हल्ल्याचे परिणाम, पाठोपाठ सुरतेवरील हल्ल्याचा धक्का यासंदर्भात २ ते ३ वौ ये लिहावीत.
**सुरतेवरील पहिला हल्ला** : सुरतेवरील हल्ल्याचे हेतू, मोहीमेची पूर्वतयारी, सुरतेवरील हल्ला
**समारोप** : शिवाजीमहाराजांच्या बंदोबस्तासाठी मिर्झाराजा जयसिंगाची मोहीम याबाबत २ ते ३ वौ ये लिहावीत.

**ई) शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक व राज्याभिषेकाची आवश्यकता**
**प्रस्तावना** : राज्याभिषक कधी व कोठे झाला ते २ ते ३ वौ यात लिहावे.
**राज्याभिषेक समारंभ** : विविध विधी, राज्याभिषेक शक, राज्यव्यवहार कोश, करणकौस्तुभ या ग्रंथांची निर्मिती, अष्टप्रधानमंडळ
**राज्याभिषेकाची आवश्यकता** : राजांची प्रतिमा बदलण्याची गरज, सत्तेचे पावित्र्य, कायदेशीरपणा व स्वातंत्र्य प्रस्थापित करणे, इतरांचा दृष्टिकोन बदलण्यची गरज
**समारोप** : मूळ राज्याभिषेकानंतर तांत्रिक राज्याभिषेक का करण्यात आला ते २ ते ३ वौ यात लिहावे.

**५. विद्यार्थीमित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व ख-या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील.** **एकूण गुण २०**

**अ) खालील घटनांची मांडणी कालानुक्रमानुसार करा.** गुण ५

प्रस्तुत प्रश्नामध्ये दिलेल्या घटनांचा क्रम कालक्रमानुसार लावा.

उदा. :

| **प्रश्नातील क्रम** | **कालानुक्रम** |
|---|---|
| १. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक | २. शिवाजीमहाराजांचा जन्म |
| २. शिवाजीमहाराजांचा जन्म | १. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक |
| ३. राजारामाचा मृत्यू | ४. संभाजीचा मृत्यू |
| ४. संभाजीचा मृत्यू | ३. राजारामाचा मृत्यू |

वर उदाहरणात दिल्याप्रमाणे खालील घटनांचा योग्य क्रम लावा.

१. आग्र्याहून सुटका
२. पुरंदरचा तह
३. शिवाजीराजांचा राज्याभिषेक
४. अफजलखानाचा वध
५. कर्नाटक मोहीम

**आ) आजच्या काळात शिवाजीमहाराज हे राजकारणाचे साधन झाले आहे असे तुम्हाला वाटते का? आपले मत उदाहरणे देऊन स्पष्ट करा. शिवाजीमहाराजांचे अनुकरण राज्यकर्त्यांनी कोणत्या बाबतीत करावे असे तुम्हाला वाटते? सविस्तर लिहा.**

गुण १५